भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ८२४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/१२/२०१६

**१) भांडणाच्या कारणावरून इसमास चाकुने मारून जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद**

दिनांक १६/१२/२०१६ चे १०.३० वा. दर. यातील जखमी गजाणन सुरज लांजेवार वय ४४ वर्ष रा. सितेपार हा आरोपीस त्याची पत्नी सौ. रिंकु शरद पांडे हिचे सोबत भांडण करून नको असे म्हणुन समजवीण्यास गेला असता आरोपी याने जखमी सोबत भांडण करूण त्याचे डाव्या हातावर चाकुने मारूण गंभीर जखमी करून जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने फियादी जितेद्र भाऊराव मेश्राम वय ४५ वर्ष रा. परसवाडा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३०७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जायले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) तिन आरोपीतांनी गाय व वासरू मॅक्स गाडीवर मांडुन चोरून नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/१२/२०१६ चे १८.०० वा. ते १६/१२/२०१६ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी देवराम काशीराम हटवार वय ६५ वर्ष, रा. सातोना यांनी यांचे शेतावरील गोठयात २ जर्सी गाय व १ वासरू कि. ७०,०००/—रू च्या बांधुन ठेवल्या होत्या त्या गाई व वासरू तिडके सब्जी भांडार नाव लिहीलेल्या बेलोरो मॅक्स गाडीवर मांडुन अनोळखी ३ आरोपी इसमांनी चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) शेतात लावलेल्या विद्युत मोटारीचा तांबा काढुन चोरून नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/१२/२०१६ ते १६/१२/२०१६ चे रात्र दर. यातील फिर्यादी शैलेश नामदेव कुकडे वय २८ वर्ष, रा. दहेगाव यांचे शेजारील शेतकऱ्याचे शेताजवळील नाल्यात लावलेल्या तिन विद्युत मोटारी सोडुन त्यातील तांबा काढुन कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन कि.४,५००/—रू तांबा चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**४) चिमुरडीला कट मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १६/१२/२०१६ रोजी १२.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादी सौ. सुनिता प्रकाश निरगुळे वय ३० वर्ष, रा. राजेद्र वार्ड शुक्रवारी भंडारा याची मुलगी कु. शरवरी वय ०३ वर्ष ही आई सोबत चौकात उभी असता तिला कट मारून खाली पाडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९, ३३८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक १६/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर, साकोली पवनी व लाखंदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८० लिटर हातभट्टी दारू कि. ४९००/—रू. व ९२ लिटर ७०० मिली देशी दारू+ टाटा सुमो कि. २,२५,७५०/—रू असा एकुण २,३०,६५० /—रू. चा माल जप्त करण्यात आला .

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.